**MHKO100010642022**

**नियमीत दिवाणी दावा क्र.२४०/२०२२ मधील निशाणी क्र.१७ वर आदेश**

प्रतिवादी क्र. १ व २ यांनी सदरचा अर्ज त्यांचे विरुध्द झालेला "विना कैफीयत" आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

**२.** प्रतिवादी यांचा अर्ज व वादी यांनी दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूचे विधीज्ञ यांनी त्यांचे अर्जातील व म्हणण्यातील कथनाप्रमाणे युक्तीवाद केला आहे.

**३.** प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी यांचे पुर्वीचे वकील बेळगांव येथील असल्याने त्यांना कामामुळे मुदतीत कैफियत दाखल करता आले नाही त्यामुळे कैफियत देण्यास विलंब झाला आहे. प्रतिवादी यांना कायदयाचे ज्ञान नसल्यामुळे व वकीलांवर अवलंबून असल्यामुळे नेमके कामात काय झाले आहे हे माहित झाले नाही. त्यांनी कैफियत देण्यास हेतुपुरस्कर अगर जाणूनबुजून टाळाटाळ केलेली नाही. सदरचा आदेश रद्द न झाल्यास प्रतिवादी यांचे नुकसान होणार आहे. सबब सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**४.** वादी यांनी सदरचे अर्जास आपले म्हणणे त्याच अर्जावर दाखल केले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी यांच्या अर्जातील संपुर्ण मजकूर चुकीचा व बेकायदेशीर आहे. अर्जातील नमूद कारणे चुकीची व खोटी असून कायदयाला सोडून आहेत. प्रतिवादी यांनी कैफियत देण्यास १ वर्षे ९ महिने कालावधी लावला आहे. न्यायाचे कारणास्तव अर्ज मंजूर झाल्यास रक्कम रू. ५०००/- इतकी कॉस्ट करण्यात यावी.

**५.** वादी यांनी सदरचा दावा दावा मिळकतीचे खरेदीपत्र पुर्ण होवून मिळणेसाठी व कायम मनाई आदेश मिळणेसाठी दाखल केला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता

असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. १ यांना दावा समन्सची बजावणी झाल्यानंतर ते दिनांक २०/०१/२०२३ रोजी न्यायालयात हजर झाले. त्यानंतर मे. न्यायालयाने प्रतिवादी क्र. १ यांनी अभिलेखावर कैफियत वेळेत दाखल न केल्यामुळे त्यांच्याविरूध्द दिनांक २७/०२/२०२४ रोजी कैफियत नाहीचा आदेश पारीत केला. प्रतिवादी क्र. २ यांचा निशाणी १२ वरील अर्ज मंजूर करण्यात आला असून त्यांचेविरूध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करण्यात आला आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र. १ व २ यांनी प्रस्तुतचा अर्ज दिनांक २७/०६/२०२४ रोजी दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रस्तुत प्रतिवादी यांची कैफीयत अभिलेखावर येणे आवश्यक आहे. प्रतिवादी यांची कैफीयत अभिलेखावर दाखल करुन घेतल्यामुळे वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. प्रतिवादी यांचे अर्जातील कथनावर अविश्वास दाखविण्यासारखी परिस्थिती अभिलेखावर आलेली नाही. परंतु प्रतिवादी क्र. १ व २ यांनी आपली कैफीयत दाखल करणेस उशीर केला हे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ व २ यांनी केलेल्या उशीराबाबत त्यांचेवर खर्च बसवून सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत वाटते. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

**१)** प्रतिवादी क्र. १ व २ यांचा अर्ज वादी यांना खर्चादाखल रक्कम रुपये ५००/- (अक्षरी रुपये पाचशे मात्र) देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

**२)** प्रतिवादी क्र. १ व २ यांनी खर्चाची रक्कम वादी यांना दिल्यानंतर प्रतिवादी यांची प्रस्तुत अर्जासोबत दिलेली कैफीयत व म्हणणे अभिलेखावर दाखल करुन घेणेत यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2024.10.19 11:25:39 +0530

ठिकाण — गडहिंग्लज
दिनांक १८/१०/२०२४

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज